(इंग्रजी भाषेत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद.)

[२०१८] १३ एस.सी.आर. २८१

भारताचे संघराज्य व अन्य

विरुद्ध

व्ही.आर. त्रिपाठी

(दिवाणी अपील क्रमांक १२०१५/२०१८)

११ डिसेंबर २०१८

[न्या. डॉ. धनंजय वाय. चंद्रचूड व न्या. एम. आर. शाह]

सेवा कायदा : नियुक्ती – अनुकंपा नियुक्ती – पहिला विवाह अस्तित्वात असताना रेल्वे कर्मचाऱ्याने केलेल्या दुसऱ्या विवाहातून जन्माला आलेला मुलगा - वडिलांच्या मृत्यूनंतर मुलाला अनुकंपा नियुक्तीचा लाभ - त्याकरिताचा दावा - रेल्वे प्रशासनाद्वारे नामंजूर करण्यात आला, मात्र, न्यायाधिकरण आणि उच्च न्यायालय यांच्याद्वारे मंजूर करण्यात आला - निर्णय दिला कि : अनुकंपा नियुक्तीकरिता असा कोणताही हक्क (अधिकार) खरे तर नाही, मात्र, त्याकरिता प्रयोजन करणारी एखादी योजना किंवा नियम जिथे अस्तित्वात आहे, त्यातील तरतुदींनुसार विचारात घ्यावयाची असते अशी, केवळ एक हक्कदारी आहे - अनुकंपा नियुक्तीच्या योजनेचे प्रयोजन आणि

योजनेचा उद्देश लक्षात घेता, एकदा कायद्याने पहिला विवाह अस्तित्वात असताना केलेल्या दुसऱ्या विवाहातून जन्मलेल्या मुलांना वैध मानले तर त्यांना अनुकंपा नियुक्तीसाठी विचारात घेण्यापासून वगळणे (वंचित ठेवणे) ही बाब, अनुज्ञेय नाही - मुले त्यांचे पालक निवडत नाहीत - अनुकंपा नियुक्ती नाकारणे ही बाब, त्यांच्या प्रतिष्ठेसाठी आणि भेदभावाविरुद्ध असलेल्या घटनात्मक हमीसाठी, अत्यंत आक्षेपार्ह अशी बाब आहे - अशा प्रकारे, दुसऱ्या विवाहातून जन्मलेल्या मुलास रेल्वे मंडळाच्या परिपत्रकाच्या अटींनुसार अनुकंपा नियुक्ती घेण्यापासून वगळणे ही बाब अधिकारबाह्य आहे - हिंदू विवाह अधिनियम,१९५५ - कलम १६.

भारतीय रेल्वेत काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्याचा काम करीत असताना मृत्यू झाला. पहिला विवाह अस्तित्वात असताना त्याने दूसरा विवाह केला आणि ह्या दुसऱ्या विवाहातून त्याला एक मुलगा झाला. त्याच्या वडिलांच्या मृत्यूनंतर उत्तरवादी-मुलाने अनुकंपा नियुक्तीसाठी अर्ज केला. ज्या परिपत्रकाअन्वये मयत कर्मचाऱ्याच्या दुसऱ्या विवाहातून जन्मलेल्या मुलांना, (वैयक्तिक कायदा इत्यादी बाबी विचारात घेऊन प्रशासनाद्वारे जर अशा विवाहाला परवानगी देण्यात आली होती तर असे प्रकरण वगळता) अनुकंपा नियुक्ती देता येणे शक्य नव्हते, अशा रेल्वे मंडळाच्या परिपत्रकाच्या पार्श्वभूमीवर, रेल्वे प्रशासनाने हा अर्ज नामंजूर केला. मात्र, न्यायाधिकरण आणि उच्च न्यायालय यांनी उत्तरवादीच्या बाजूने निकाल दिला . त्यामुळे, प्रस्तुतचे अपील.

प्रकरणे निकाली काढीत, न्यायालयाने,

नमूद केले की: १.१ अनुकंपा नियुक्तीचे धोरण हे कामावर असताना झालेल्या कर्मचाऱ्याच्या मृत्यूवर आधारित आहे. कर्मचाऱ्याच्या मृत्यूमुळे कुटुंब आर्थिक अडचणीत आणि गरजेच्या स्थितीत येते. अनुकंपा नियुक्ती ही सेवेत असताना अकाली मृत्यू झाल्यास मयत कर्मचाऱ्याच्या कुटुंबियांना सामना कराव्या लागणाऱ्या अडचणी कमी करण्याच्या हेतूने आहे. अनुकंपा नियुक्ती ही, दुसऱ्या शब्दांत, केवळ पालकत्व किंवा वंशावळ यांवर आधारित नाही, कारण, सार्वजनिक सेवायोजन हे, राज्यघटनेचे अनुच्छेद १६ जे हमी देते, अशा संधीच्या समानतेशी सुसंगत असणे आवश्यक आहे. त्यामुळे, अनुकंपा नियुक्तिकरिताचा दावा एखाद्या मयत कर्मचाऱ्याच्या कुटुंबाद्वारे करण्यात येतो किंवा त्यास राज्याद्वारे मंजूर करण्यात येतो, त्याअगोदर, ज्यात अशा नियुक्तीची कल्पना करण्यात येते असे नियम किंवा एखादी योजना नियोक्त्याकडे असणे अत्यावश्यक आहे. हे त्या अर्थाने आहे की कायद्याचे जुने तत्त्व आहे की, अनुकंपा नियुक्तीकरिता कोणताही हक्क अस्तित्वात नाही. जिथे अनुकंपा नियुक्तीची योजना आहे तिथे हक्कदारीसाठीचा अर्ज हा केवळ नियमांच्या किंवा योजनेच्या अटी पूर्ण करीत असण्याच्या अधीन राहून विचारात घेणे शक्य असते. या तत्त्वाबद्दल कोणतीही शंका असू शकत नाही की, अनुकंपा नियुक्तीकरता अस्तित्वांत असलेला असा, कोणताही हक्क नाही, जिथे तशी कल्पना करणारी अशी एखादी योजना किंवा नियम

अस्तित्वात आहे तिथे त्यातील तरतुदींनुसार विचारात घ्यावयाची अशी ती केवळ एक हक्कदारी आहे. [परिच्छेद १४] [पान क्र. २८९-जी-एच; २९०-ए-डी]

१.२ निःसंशयपणे, अनुकंपा नियुक्तीचे धोरण आखताना ती कोणत्या अटींवर मंजूर करता येईल, हे राज्य ठरवू शकते. मात्र, योजना किंवा नियम बनवताना, राज्यघटनेच्या अनुच्छेद १४ सोबत विसंगत राहिल अशी अट घालणे राज्याकरिता अनुज्ञेय नाही. अनुकंपा नियुक्तीचा उद्देश, मयत कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील संपूर्ण दारिद्र्य आणि आत्यंतिक दारिद्र्य टाळणे, हा आहे. या परिपत्रकाचा परिणाम असा आहे की, मयत कर्मचाऱ्याच्या दुसऱ्या विवाहातून जन्माला आलेल्या मुलाला संपूर्ण दारिद्र्य सहन करावे लागले तरीही, प्रशासनाच्या परवानगीने दूसरा विवाह झालेला असेल तरच अनुज्ञेय अन्यथा नाही, अनुकंपा नियुक्ती नाकारली आहे. एकदा हिंदू विवाह अधिनियम १९५५ चे कलम १६ अंतर्गत पहिला विवाह अस्तित्वात असताना केलेल्या दुसऱ्या विवाहातून जन्माला आलेले मूल वैध असल्याचे मानल्यास, अशा मुलाला अनुकंपा नियुक्ती मागण्यापासून वगळणे ही बाब, अनुच्छेद १४ सह सुसंगत राहण्याकरिता, राज्यासाठी अनुज्ञेय नाही. वगळण्याची अशी एखादी अट ही जुलमी आणि अधिकारबाह्य आहे. [परिच्छेद १४] [पान क्र. २९१-एच; २९२-ए-सी]

१.३ संकुचित वर्गीकरण चाचणीचा अवलंब केला तरी, रेल्वे मंडळाचे परिपत्रक हे कायदेशीर मुलांच्या एका वर्गात दोन प्रवर्ग निर्माण करते. कायद्याने दुसऱ्या

विवाहातून जन्माला आलेले मूल वैध मानले असले तरी, मयत कर्मचाऱ्याच्या पहिल्या विवाहातून जन्माला आलेल्या मुलालाच केवळ, अनुकंपा नियुक्तीच्या लाभाकरिता, हक्कदार करण्यात आले आहे. अनुकंपा नियुक्ती देण्यामागचा एकमेव हेतू, जो मयत कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील संपूर्ण दारिद्र्य आणि आत्यंतिक दारिद्र्य टाळण्यासाठी आहे, त्यात, लादण्यात आलेली अशी कोणतीही शर्त किंवा अट ही साध्य करावयाचे इच्छित आहे त्या उद्देशाशी, वाजवी संबंध असणे किंवा येणे आवश्यक आहे. असा युक्तिवाद करण्यात आला की, दोन विवाह करण्यास निरुत्साहित करण्याच्या धोरणाचा भाग म्हणून, अनुकंपा नियुक्तीचा लाभ, केवळ पहिल्या विवाहातील जोडीदार व मुले यांच्यापुरतेच केवळ मर्यादित ठेवणे आणि नंतरच्या विवाहातील जोडीदार व मुले यांना तो नाकारणे, ही बाब, राज्याकरिता अनुज्ञेय आहे. दुसऱ्या विवाहतून जन्माला आलेल्या मुलांना वगळण्याच्या संबंधाने चिंता व्यक्त करण्यात आली आहे. कायद्याच्या प्रचालनाद्वारे ज्यास वैध समजण्यात आलेले आहे असा वर्ग वगळल्याने साध्य करावयाच्या इच्छित उद्दिष्टासोबत लादण्यात आलेली अट ही, अवाजवी आहे. अनुकंपा नियुक्तीच्या योजनेचे प्रयोजन व उद्देश लक्षात घेता, एकदा का कायद्याने अशा मुलांना वैध मानल्यानंतर अनुकंपा नियुक्तीसाठी विचारात घेण्यापासून त्यांना वगळणे अनुज्ञेय नाही. मुले त्यांच्या आई-वडिलांची निवड करत नाहीत. कायद्याने अवैध अशा विवाहातून जन्मास आलेल्या मुलाला वैध मानले

तरी, त्यास अनुकंपा नियुक्ती नाकारणे ही बाब त्यांच्या प्रतिष्ठेला अत्यंत आक्षेपार्ह आहे आणि भेदभावाविरोधात असलेल्या घटनात्मक हमीला ते आक्षेपार्ह आहे. [परिच्छेद १५] [पान क्र. २९२ डी-जी]

१.३ वैध मुलांच्या एका वर्गाला अनुकंपा नियुक्ती घेण्यापासून केवळ या कारणास्तव वगळणे की, अर्जदाराची आई ही मयत कर्मचाऱ्याची एकापेक्षा अधिकची असलेली अशी पत्नी आहे, ही बाब साध्य करावयाच्या इच्छित उद्दिष्टासोबत वाजवी संबंध असण्याची कसोटी पूर्ण करण्यात, अपयशी ठरेल. कामावर असताना ज्याचे निधन झालेले होते अशा मयत कर्मचाऱ्याच्या कुटुंबाची प्रतिष्ठा राखण्याच्या संपूर्ण उद्देशाला ते आक्रमक राहिल व त्यास ते पराभूत करते. ते, वैध लाभार्थी-वैध मुले, यांच्या एका वर्गादरम्यान, घटनाबाह्य भेदभाव निर्माण करते. त्यामुळे, दुसऱ्या विवाहातून जन्माला आलेल्या एखाद्या मुलाला, रेल्वे मंडळाच्या परिपत्रकातील शर्ती नुसार अनुकंपा नियुक्ती मागण्यापासून वगळणे ही बाब अधिकारबाह्य आहे. [परिच्छेद १६, १८] [२९३-सी-डी; २९४-जी-एच; २९५-ए]

१.४ उत्तरवादीने असा युक्तिवाद केला की, एकदा का ०२.०१.१९९२ रोजीचे परिपत्रक कलकत्ता उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने नमिता गोलदार या प्रकरणात रद्दबातल ठरविले, स्वीकारले व अंमलबजावणी केली, ज्या परिपत्रकाला संपूर्ण भारतव्यापी अंमल आणि प्रभाव आहे, अशा परिपत्रकावर अवलंबून राहणे, हे रेल्वे

अधिकाऱ्यांकरिता त्यानंतर अनुज्ञेय नाही . या युक्तिवादामध्ये गुणवत्ता आहे. त्यामुळे, अंतिमत्व प्राप्त झाले अशा नमिता गोलदार या प्रकरणातील निकालानंतरही, अगोदरच्या परिपत्रकातील अटींचा पुनरुच्चार करीत ३ एप्रिल २०१३ रोजी नवीन परिपत्रक काढणे ही बाब,रेल्वे मंडळाकरिता अयोग्य अशी बाब आहे. [परिच्छेद २०][२९५-सी-डी].

२. सी.ए. क्र. १२०१५/२०१८ च्या संबंधाने, दुसरा विवाह हा मुस्लिम वैयक्तिक कायद्यानुसार कोणत्याही परिस्थितीत मंजूर होतो, त्यामुळे या अपीलात कोणतीही गुणवत्ता नाही. [परिच्छेद २३] [२९५-एफ-जी]

नमिता गोलदार विरुद्ध भारताचे संघराज्य **(२०१०) १ कॅल.एलजे ४६४ - मान्य करण्यात आले.**

रामेश्वरी देवी विरुद्ध बिहार राज्य **(२०००) २ एससीसी ४३१ : [२०००] १ एससीआर ३९० ;** शिक्षण संचालक (माध्यमिक) विरुद्ध पुष्पेंद्र कुमार **(१९९८) ५ एससीसी १९२ : [१९९८] ३ एससीआर ४३२ ;** स्टेट बँक ऑफ इंडिया विरुद्ध राज कुमार **(२०१०) ११ एससीसी ६६१ ;** व्ही सिवामूर्थी विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य **(२००८) १३ एससीसी ७३० : [२००८] ११ एससीआर १२०१;** ईस्टर्न कोलफील्ड्स लिमिटेड विरुद्ध दिलीप सिंह **(२०१३) ३ कॅल.एलटी ३७९ ;** एम मुथुराज विरुद्ध पोलिस उप महा,

तामिळनाडू **(२०१६) ५ सीटीसी ५० ;** भारताचे संघराज्य विरुद्ध एम कारुंबयी **२०१७ लॅब. आयसी (एनओसी २३७) ६९ -** संदर्भित करण्यात आले.

<u>निर्णय विधी संदर्भ</u>

[२०००] १ एससीआर ३९० संदर्भित करण्यात आले परिच्छेद ५ (iii)

[१९९८] ३ एससीआर ४३२ संदर्भित करण्यात आले परिच्छेद १०

(२०१०) ११ एससीसी ६६१ संदर्भित करण्यात आले परिच्छेद १०

[२००८] ११ एससीआर १२०१ संदर्भित करण्यात आले परिच्छेद १०

(२०१३) ३ कॅल.एलटी ३७९ संदर्भित करण्यात आले परिच्छेद १७

(२०१६) ५ सीटीसी ५० संदर्भित करण्यात आले परिच्छेद १८

२०१७ लॅब.आयसी (एनओसी २३७) ६९ संदर्भित करण्यात आले परिच्छेद १८

(२०१०) १ कॅल.एलजे.४६४ मान्य करण्यात आले परिच्छेद २०

<u>दिवाणी अपिलीय अधिकारक्षेत्र</u> : **दिवाणी अपील क्र. १२०१५/२०१८.**

रिट याचिका क्र. ९१०/२०१५ मधील मुंबई उच्च न्यायालयाचे, दिनांक

०१.०४.२०१६ चे न्यायनिर्णय व आदेशापासून .

सह

दिवाणी अपील क्र. १२०१६/२०१८.

अमन लेखी, एएसजी, हरीश पांडे, अनिल कटियार, मुकेश कुमार मारोरिया, अपीलकर्त्यांचे वकील .

अर्जुनसिंग भाटी, अपूर्व पराशरी, उत्तरवादींचे वकील.

न्यायालयाचा निर्णय **डॉ. न्या. धनंजय वाय. चंद्रचूड** यांच्याद्वारे देण्यात आला.

दिवाणी अपील क्र. १२०१५/२०१८.

१. अनुमती दिली .

२. हे अपील मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाच्या १ एप्रिल २०१६ रोजीच्या न्यायनिर्णयातून उद्भवते .

३. उत्तरवादीचे वडील - रामलखन त्रिपाठी हे टेक्निशियन, ग्रेड-१ म्हणून मध्य रेल्वे, मुंबई येथे नोकरीत होते. २८ नोव्हेंबर २००९ रोजी कामावर असताना तो मयत झाला. मयत कर्मचाऱ्याने त्याचा पहिला विवाह अस्तित्वात असताना दुसरा विवाह केला. उत्तरवादी हा त्या कर्मचाऱ्याच्या दुसऱ्या विवाहातून जन्मास आलेला मुलगा आहे.

दुसरा विवाह, दिसून येते त्याप्रमाणे, सन १९८७ मध्ये करण्यात आला. उत्तरवादीने त्याच्या वडिलांच्या मृत्यूनंतर, अनुकंपा नियुक्तीसाठी अर्ज केला. हा अर्ज, दिनांक ६ मार्च २०१२ रोजी रेल्वे प्रशासनाद्वारे नामंजूर करण्यात आला. अनुकंपा नियुक्तीच्या नकारामुळे व्यथित होऊन, उत्तरवादीने केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे एक मूळ अर्ज दाखल केला. न्यायाधिकरणाने उत्तरवादीच्या बाजूने निकाल दिला आणि पुनर्विचार करण्याची मागणी करणारी याचिका फेटाळल्यानंतर, भारताचे संघराज्य व रेल्वे प्राधिकारी यांनी मुंबई उच्च न्यायालयासमोर रिट कार्यवाही सुरू केली.

४. रिट याचिकेच्या समर्थनार्थ, अपीलकर्त्यांनी रेल्वे मंडळाच्या दिनांक २ जानेवारी १९९२ च्या परिपत्रकावर भिस्त ठेवली. हे परिपत्रक खालीलप्रमाणे आहे:

"भारत सरकार,

रेल्वे मंत्रालय

(रेल्वे मंडळ)

१९९२ चा आर.बी.ई.क्र.१

मुख्य परिपत्रकाला पुरवणी परिपत्रक क्रमांक ५

महाव्यवस्थापक (पी)

मध्य रेल्वे व इतर

विषय: दुसरी विधवा व तिचे पाल्य यांच्या अनुकंपा आधारावरील नियुक्तीची प्रकरणे.

असे स्पष्ट करण्यात आले आहे की, रेल्वे कर्मचारी कामावर असताना एकापेक्षा अधिक असलेल्या पत्नीच्या पोटी जन्मलेल्या मुलांसह त्याचे वारस म्हणून मागे ठेऊन, मयत झालेला असताना, न्यायालयाच्या आदेशामुळे किंवा इतःपर कोणत्याही प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार दुसरी विधवा व तिची मुले यांची अनुकंपा आधारावरील नियुक्ती, वैयक्तिक कायदा इ. लक्षात घेऊन, विशेष परिस्थितीत, प्रशासनाने दुसऱ्या विवाहास परवानगी दिल्याशिवाय, विचारात घेता येणार नाही.

२. दुसरा विवाह हा अनुज्ञेय नाही हे तथ्य, सुरुवातीच्या नियुक्तीच्या प्रस्तावाला जोडलेल्या अटी व शर्तीमध्ये न चुकता स्पष्ट करण्यात येते.

३. हे दृष्टिकोनात ठेवता येईल आणि दुसरी विधवा किंवा तिचे पाल्य यांच्या अनुकंपा नियुक्तीची प्रकरणे रेल्वे मंडळाकडे पाठविण्याची गरज नाही.

४.कृपया पोच देणे .

स्वाक्षरी/-

(पी.एल.एन. सरमा)

उपसंचालक, आस्थापना (एन)

रेल्वे मंडळ "

५. उच्च न्यायालयाने नमूद केले की:

(१) हिंदू विवाह अधिनियम, १९५५ चे, कलम १६ हे, कलम ११ च्या तरतुदींनुसार, जो अवैध व निरर्थक आहे अशा विवाहातून, जन्मलेल्या मुलाच्या वैधतेला मान्य करते;

(२) रेल्वे मंडळाच्या २ जानेवारी १९९२ रोजीच्या परिपत्रकाला कलकत्ता उच्च न्यायालयाच्या खंडपीठाद्वारे **नमिता गोलदार विरुद्ध भारताचे संघराज्य** [1] या प्रकरणात रद्दबातल ठरविण्यात आले ; आणि

(३) **रामेश्वरी देवी विरुद्ध बिहार राज्य** [2] या प्रकरणामधील या न्यायालयाच्या निर्णयामध्ये, मयत कर्मचाऱ्याने त्याच्या हयातीत दुसरा विवाह केला असे तथ्य असतानाही, मयत कर्मचाऱ्याच्या कुटुंबाच्या निवृत्तीवेतनविषयक लाभाकरिताच्या हक्कदारीला मान्य करण्यात आलेले आहे.

६. वरील आधारावर प्रामुख्याने, उच्च न्यायालयाला , केंद्रीय प्रशासकीय

---

1 (२०१०) १ कॅल एलजे ४६४

2 (२०००) २ एससीसी ४३१

न्यायाधिकरणाच्या दृष्टिकोनापेक्षा वेगळा दृष्टिकोन ठेवण्याकरिता कोणतेही कारण आढळले नाही आणि उच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की रेल्वे प्राधिकाऱ्यांना देण्यात आलेला निर्देश हा, अनुकंपा नियुक्तीकरिता उत्तरवादीचा दावा त्याच्या गुणवत्तेवर केवळ विचारात घेणे, याकरिता होता.

७. उच्च न्यायालयाच्या निर्णयाला तीव्र विरोध करीत, श्री. अमन लेखी, विद्वान अतिरिक्त महान्यायअभिकर्ता यांनी युक्तिवाद केला की:

(१) अनुकंपा नियुक्ती ही सेवायोजन किंवा भरती याकरिताचा पर्यायी स्त्रोत नाही;

(२) अनुकंपा नियुक्ती हा काही आनुवंशिक असा हक्काचा विषय नाही आणि ती, ज्याअंतर्गत असे लाभ किंवा सुविधा याची कल्पना करण्यात येते त्या सध्या अस्तित्वात असलेल्या नियम किंवा योजना याच्यावर अवलंबून आहे ;

(३) हिंदू विवाह अधिनियम, १९५५ चे कलम १६ (३) अशी कल्पना करते की, कलम ११ अन्वये अवैध अशा विवाहातून जन्माला आलेल्या मुलास केवळ आई-वडिलांच्या मालमत्तेसंदर्भात दावा आहे, इतर कोणाच्याही मालमत्तेसंदर्भात दावा नाही;

(४) **रामेश्वरी देवी (उपरोल्लेखित)** या प्रकरणातील या न्यायालयाचा निर्णय

निवृत्तीवेतन बाबत वेगळेपण दर्शविण्यायोग्य आहे; चांगल्या प्रकारे स्थापित आहे,ती एखाद्या कर्मचाऱ्याच्या मागील सेवेचा परिणाम म्हणून असलेल्या हक्काची बाब आहे आणि म्हणूनच मालमत्तेच्या स्वरूपातील एका हक्कदारीचे ती प्रतिनिधित्व करते, आणि

(४) दुसरीकडे, मयत कर्मचाऱ्याच्या वारसांना अनुकंपा नियुक्तीचा कोणताही हक्क नाही. त्यामुळे, भारताचे संघराज्य किंवा त्याच्या एजन्सी व त्याचे विभाग यांना अनुकंपा नियुक्तीचे धोरण आखत असतांना असे विहीत करणे अनुज्ञेय आहे की, हि सुविधा एकतर दुसऱ्या विवाहाच्या जोडीदाराला किंवा, तशीच बाब असेल तर, त्या विवाहातून जन्माला येतात त्या मुलांना, उपलब्ध होणार नाही. राज्य हे, द्विविवाह पद्धतीस परावृत्त करण्यासाठीच्या त्याच्या धोरणाचे एक वैध साधन म्हणून असे करू शकते.

८. द्वसरीकडे, श्री अर्जुन सिंह भाटी आणि श्री अपूर्व पराशर, उत्तरवादीच्या वतीने उपस्थित विद्वान वकील यांनी असा युक्तिवाद केला की:.

(१) हिंदू विवाह अधिनियमाचे कलम १६ स्पष्टपणे नमूद करते की, अवैध व निरर्थक आहे अशा विवाहातून जन्माला आलेली मुले वैध आहेत;

(२) संघराज्य शासन ठामपणे प्रतिपादित करु शकते की, द्वितीय जोडीदार हा/

ही अनुकंपा नियुक्तीकरिता हक्कदार नाही, मात्र अशी सुविधा द्वितीय विवाहापांसून जन्मास आलेल्या मुलांना,त्यांची वैधता ही कायद्याची विषयवस्तू म्हणून कार्य करते तेथे, नाकारणे शक्य नाही; आणि

(३) **नमिता गोलदार (उपरोल्लेखित)** या प्रकरणामधील निर्णयाने, रेल्वे मंडळाचे दिनांक २ जानेवारी १९९२ रोजीचे परिपत्रक रद्दबातल ठरविले. त्या निर्णयाला आव्हान देण्यात आले नाही आणि प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही. त्यामुळे, रेल्वे मंडळाद्वारे ३ एप्रिल २०१३ रोजी, आधीच्या परिपत्रकाचा पुनरुच्चार करत काढण्यात आलेले नंतरचे परिपत्रक हे कलकत्ता उच्च न्यायालयाच्या **नमिता गोलदार (उपरोल्लेखित)** या प्रकरणामधील निर्णयाच्या, जो निर्णय दिनांक १ फेब्रुवारी २०१० रोजी देण्यात आला होता, विपरीत आहे.

९. प्रतिस्पर्धी युक्तिवाद आमच्या विचारार्थ येतात.

१०. अनुकंपा नियुक्ती मंजूर करण्यासंदर्भातील काही मूलभूत तत्त्वे या न्यायालयाच्या निर्णयांद्वारे निश्चित करण्यात आली आहेत. शिक्षण संचालक (माध्यमिक) विरुद्ध पुष्पेंद्र कुमार[3] या प्रकरणात या न्यायालयाने अनुकंपा नियुक्तीच्या उद्देशावर चर्चा करताना, खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदवले:

3 (१९९८) ५ एससीसी १९२

"८. अनुकंपा रोजगार देण्याच्या तरतुदीमागचा उद्देश, ज्या संकटाने त्या कुटुंबाला दारिद्यामध्ये व उपजीविकेचे कोणतेही साधन नसणे अशा स्थितीमध्ये आणले आहे अशा, पोशिंद्याच्या मृत्यूमुळे उद्भवलेल्या अचानक संकटातून बाहेर पडण्यास मयत कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला सक्षम करणे, हा आहे. निव्वळ मानवतावादी विचारातून आणि जोपर्यंत असे उदरनिर्वाहाचे काही स्त्रोत उपलब्ध करण्यात येत नाही तोपर्यंत कुटुंबाला उदरनिर्वाह करणे शक्य होणार नाही, या अशा तथ्याला विचारात घेत, जो अशा नियुक्तीस पात्र ठरू शकेल अशा मयताच्या अवलंबितांपैकी एकाला, लाभदायक नियुक्ती देण्याकरिता तरतूद करण्यात आली आहे..."

स्टेट बँक ऑफ इंडिया विरुद्ध राजकुमार[4] या प्रकरणात या न्यायालयाने, अनुकंपा नियुक्तीच्या दाव्यावर चर्चा करताना, खालीलप्रमाणे नमूद केले:

"८. अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती हा भरतीचा स्त्रोत नाही हे आता सर्वमान्य झाले आहे. दुसरीकडे, सार्वजनिक सेवायोजनेतील भरती हा सर्वसाधारण नियमाला अपवाद आहे. दुसरीकडे, ती या सर्वसाधारण नियमाला अपवाद आहे की, सार्वजनिक सेवायोजनेतील भरती ही, गुणवत्तेच्या आधारावर सर्व पात्र व्यक्तींना निवड प्रक्रियेत सहभागी होण्याची समान संधी प्रदान करीत दिलेल्या खुल्या

---

4 (२०१०) ११ एससीसी ६६१

निमंत्रणाद्वारे करण्यात यावी. कर्मचारी, जे कामावर असताना मयत होतात त्यांच्या अवलंबितांना, अचानक आलेल्या आर्थिक संकटातून बाहेर पडण्यास मयताच्या कुटुंबाला सक्षम करण्याकरिता नियमांअंतर्गत किंवा एखाद्या स्वतंत्र योजनेद्वारे नियोक्त्याद्वारे कदाचित लागू करण्यात येईल अशा सवलतींनुसार असल्याचा अपवाद करीत, सेवायोजनेकरिता, कोणताही विशेष दावा किंवा हक्क नसतो. त्यामुळे अनुकंपा नियुक्तीचा दावा हा केवळ अशा सेवायोजनेसाठी नियोक्त्याने आखलेल्या योजनेपुरताच ग्राह्य धरला जातो आणि अशा योजनेच्या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा अधिकार तेथे नाही. त्या योजनेंतर्गत नियुक्ती ही, ती योजना लागू आहे तोपर्यंतच करण्यात येणे शक्य आहे आणि ती रद्द करण्यात आली/मागे घेण्यात आली त्यानंतर करणे शक्य नाही. म्हणून असे निष्कर्षित होते की, जेव्हा एखादी योजना रद्द करण्यात येते तेव्हा त्या योजनेअंतर्गत नियुक्तीची मागणी करणारा प्रलंबित अर्ज हा, जर त्यास संरक्षित करण्यात आले असेल तरच अन्यथा नाही अस्तित्वात राहील. केवळ असे तथ्य की, एखादा अर्ज हा ती योजना अस्तित्वांत होती तेव्हा करण्यात आला होता, ती बाब स्वतःहून अर्जदाराच्या हितामध्ये एखादा हक्क निर्माण करणार नाही. (यावर भर देण्यात आला.)

व्ही सिवामूर्थी विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य या प्रकरणात [5] या न्यायालयाने अनुकंपा नियुक्तीसंदर्भातील तत्त्वांना खालीलप्रमाणे सारांशित केले:

" १८. (ए) केवळ वंशावळीवर आधारित असलेली अनुकंपा नियुक्ती ही अमान्य आहे. लोकसेवेतील नियुक्त्या या भारताचे संविधानाचे अनुच्छेद १४ व १६ यांना विचारात घेत, अर्जांकरिता खुले आमंत्रण व तुलनात्मक गुणवत्ता यांच्या आधारावर, काटेकोरपणे करण्यात याव्यात. नियुक्तीची इतर कोणतीही पद्धत जरी अनुज्ञेय नसली तरीही, अनुकंपा तत्त्वावरील नियुक्त्या, सदरच्या सर्वसाधारण नियमाला काही आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी न्यायाच्या हितामध्ये तयार करण्यात आलेले असे, चांगल्या त-हेने मान्य करण्यात आलेले अपवाद आहेत.

(सी) अनुकंपा नियुक्तीकरिता दावा करणे किंवा ती नियुक्ती मंजूर करणे तोपर्यंत शक्य नाही जोपर्यंत, सेवेला नियंत्रित करणारे नियम अशा नियुक्त्यांना परवानगी देत नाही. अशा नेमणुका या, अशा नियुक्त्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या योजनेनुसार व विद्यमान रिक्त पदांच्या विरोधात काटेकोरपणे राहतील. ”

(यावर भर देण्यात आला.)

---

5 (२००८) १३ एससीसी ७३०

११. अनुकंपा नियुक्तीचे धोरण हे कामावर असताना झालेल्या कर्मचाऱ्याच्या मृत्यूवर आधारित आहे. कर्मचाऱ्याच्या मृत्यूमुळे कुटुंब आर्थिक अडचणीत आणि गरजेच्या स्थितीत येते. अनुकंपा नियुक्ती ही, सेवेत असताना अकाली मृत्यू झाल्यास मयत कर्मचाऱ्याच्या कुटुंबियांना सामना कराव्या लागणाऱ्या अडचणींना कमी करण्याचा हेतूने आहे. अनुकंपा नियुक्ती ही, दुसऱ्या शब्दांत, केवळ पालकत्व किंवा वंशावळ यावर आधारित नाही, ती सार्वजनिक सेवायोजनेसाठी राज्यघटनेचे अनुच्छेद १६ जे संधीच्या समानतेची हमी देते, त्याच्याशी सुसंगत असणे आवश्यक आहे. त्यामुळे, जेव्हा अनुकंपा नियुक्ती करिताचा दावा एखाद्या मयत कर्मचाऱ्याच्या कुटुंबाद्वारे करण्यात येतो किंवा त्यास राज्याद्वारे मंजूर करण्यात येते तेव्हा अशा नियुक्तीची कल्पना करण्यात येते असे नियम किंवा एखादी योजना नियोक्त्याकडे असणे अत्यावश्यक आहे. हे त्या अर्थाने आहे कि कायद्याचे हे जुने तत्त्व आहे की, अनुकंपा नियुक्तीकरिता कोणताही हक्क अस्तित्वात नाही. जिथे अनुकंपा नियुक्तीची योजना आहे तिथेही, हक्कासाठीचा अर्ज केवळ नियमाच्या किंवा योजनेच्या अटी पूर्ण करीत असण्याच्या अधीन राहून विचारात घेणे शक्य असते. असा युक्तिवाद ज्याचा भारताचे संघराज्य यांच्या वतीने उपस्थित विद्वान अतिरिक्त महान्यायअभिकर्ता यांच्याद्वारे आग्रहीत करण्यात आला आहे, तो, अनुकंपा नियुक्तीकरिता कोणताही हक्क अस्तित्वात नाही या आधारावर गृहीत धरण्यात आला आहे. या तत्त्वाबद्दल कोणतीही शंका असू शकत नाही की,

अनुकंपा नियुक्तीकरता अस्तित्वात असलेला कोणताही हक्क हा तशी कल्पना करणारी अशी एखादी योजना किंवा नियम अस्तित्वात आहे त्यातील तरतुदींनुसार विचारात घ्यावयाची अशी केवळ एक हक्कदारी आहे.

१२. प्रस्तुतच्या प्रकरणातील खरा वाद मुद्दा असा आहे कि मयत कर्मचाऱ्याच्या दुसऱ्या विवाहातून जन्माला आलेल्या मुलांना (वैयक्तिक कायदा इत्यादी बाबी विचारात घेऊन प्रशासनाद्वारे जर अशा लग्नाला परवानगी देण्यात आली होती तर असे प्रकरण वगळता) अनुकंपा नियुक्ती देता येणे शक्य नाही, ही रेल्वे मंडळाच्या परिपत्रकाद्वारे लादण्यात आलेली अट संविधानाच्या अनुच्छेद १४ शी सुसंगत असेल, याकरिता निष्पक्षता आणि समान वागणूक यांच्या मूलभूत संकल्पनांशी सुसंगत आहे का? या वादमुद्द्याचे उत्तर देतांना, हिंदू विवाह अधिनियम, १९५५ च्या कलम १६ मधील तरतुदींना उद्धृत करणे आवश्यक राहिल, ज्या खालीलप्रमाणे आहेत :

> १६. अवैध व निरर्थक विवाहाच्या मुलांची वैधता.- (१) कलम ११ अन्वये विवाह अवैध व निरर्थक असला तरी, अशा विवाहातुन जन्माला आलेले कोणतेही मूल, जो विवाह वैध असता तर वैध ठरलेले असते ते मूल, विवाह कायदे (सुधारणा) अधिनियम, १९७६ (१९७६ चा ६८) लागू होण्यापूर्वी किंवा नंतर जन्माला आले तरी आणि या अधिनियमांतर्गत त्या विवाहाच्या संदर्भात अवैधतेचा हुकूमनामा मंजूर करण्यात आला आहे असेल किंवा नाही किंवा

अधिनियमाअंतर्गत केलेल्या याचिकेच्या अनुषंगाने करण्यात आल्याच्या इतःपर, अवैध असल्याचे नमूद करण्यात आले असेल किंवा नसेल तरी, वैध समजण्यात येईल .

(२) कलम १२ अन्वये निरर्थक विवाहाच्या संबंधाने जेथे अवैधतेचा हुकूमनामा मंजूर करण्यात आला आहे तेथे, हूकूमनामा जारी करण्याअगोदर जन्माला आलेले किंवा गर्भधारणा झालेले कोणतेही मूल, जे विवाहातील पक्षकारांचे जर तो विवाह हुकुमनाम्याच्या तारखेला अवैध केलेल्या अवस्थेत असण्याऐवजी विसर्जित करण्यात आलेला असेल आणि त्याबाबत अवैधतेचा हुकूमनामा झालेला असेल तरीही, ते त्यांचे वैध मूल समजण्यात येईल.

(३) उपकलम (१) किंवा उपकलम (२) मध्ये तरतूद करण्यात आलेल्या कोणत्याही बाबीला, जो अवैध व निरर्थक आहे किंवा ज्यास कलम १२ अंतर्गत पारित करण्यात आलेल्या अवैधतेच्या हुकूमनाम्याअन्वये अवैध करण्यात आला आहे त्या विवाहातुन जन्माला आलेले कोणतेही मूल आई-वडिलांच्या मालमत्तेशिवाय इतर कोणत्याही व्यक्तीच्या मालमत्तेत कोणत्याही परिस्थितीत, हा अधिनियम अमलात आल्यामुळे, ते त्याच्या आई-वडिलांचे वैध मूल नसल्याच्या कारणामुळे, असे कोणतेही अधिकार धारण करण्यास

किंवा प्राप्त करण्यास अक्षम होतो ."

१३. कलम १६ च्या उपकलम (१) मध्ये, विधिमंडळाने असे नमूद केले आहे की, एखादे मूल, जे कलम ११ अन्वये अवैध व निरर्थक आहे अशा विवाहातून, १९७६ चा सुधारित अधिनियम क्र. ६८ लागू होण्याच्या पूर्वी किंवा नंतर जन्माला आले आहे ते या बाबीशी संबद्ध न राहता, वैध आहे. अवैध व निरर्थक अशा विवाहातून जन्माला आलेल्या मुलाची वैधता ही, अनैतिकतेचा परिणाम भोगण्यापासून अशा अखाद्या विवाहातून जन्माला आलेल्या एखाद्या मुलाचे संरक्षण करणे याअनुषंगाने असलेली अशी, सार्वजनिक धोरणाची एक विषयवस्तू आहे. त्यामुळे, विवाह जरी अवैध व निरर्थक असला तरीही, अशा विवाहातून जन्माला आलेले मूल हे कलम १६ च्या उपकलम (१) नुसार, निश्चितच वैध मानण्यात येते. अनेक आधारांपैकी एक ज्यावर, कलम ५ च्या खंड (१) सह कलम ११ चे वाचन अन्वये एखादा विवाह अवैध व निरर्थक तेव्हा ठरतो जेव्हा, विवाहाच्यावेळी दोन पक्षकारांपैकी एका पक्षाकडे जिवित असलेला असा जोडीदार होता. पहिला विवाह अस्तित्वात असताना एखाद्या हिंदूद्वारे करण्यात आलेला दुसरा विवाह हा म्हणून अवैध व निरर्थक आहे. मात्र, विधिमंडळाने, अशा विवाहातून जन्माला येणाऱ्या मुलाच्या वैधतेचे रक्षण करण्यासाठी, कलम १६ (१) अधिनियमित करीत पाऊल उचललेले आहे. कलम १६ चे उपकलम (३), मात्र, असे विहित करते की, अवैध व निरर्थक आहे अशा एखाद्या

विवाहातून जन्माला आलेल्या एखाद्या मुलाला केवळ आई-वडिलांच्या मालमत्तेत हक्क असेल आणि इतर कोणाच्याही मालमत्तेत हक्क नसेल.

१४. आवश्यक मुद्दा असा आहे की, एखादा नियोक्ता, जो राज्यघटनेच्या भाग ३ नुसार वागणे अपेक्षित आहे त्याने इतर वैध मुलांना उपलब्ध आहे असा अनुकंपा नियुक्तीचा लाभ नाकारणे, अनुज्ञेय आहे का? निःसंशयपणे, अनुकंपा नियुक्तीचे धोरण आखताना ती कोणत्या अटींवर मंजूर करता येईल हे राज्य ठरवू शकते. मात्र, योजना किंवा नियम बनवताना, राज्यघटनेच्या अनुच्छेद १४ सोबत विसंगत राहिल अशी अट घालणे राज्याकरिता अनुज्ञेय नाही. अनुकंपा नियुक्तीचा उद्देश, मयत कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील संपूर्ण दारिद्र्य आणि आत्यंतिक दारिद्र्य टाळणे हा आहे. या परिपत्रकाचा परिणाम असा आहे की, मयत कर्मचाऱ्याच्या दुसऱ्या विवाहातून जन्माला आलेल्या मुलाला संपूर्ण दारिद्र्य सहन करावे लागले तरीही , प्रशासनाच्या परवानगीने दुसरा विवाह केला तर अन्यथा नाही, अनुकंपा नियुक्ती नाकारली आहे. हिंदू विवाह अधिनियम, १९५५ च्या कलम १६ नुसार पहिला विवाह अस्तित्वात असताना केलेल्या दुसऱ्या विवाहातून जन्माला आलेले मूल वैध असण्याचे मानते तर, अशा मुलाने अनुकंपा नियुक्ती मागण्यापासून त्यास वगळणे ही बाब अनुच्छेद १४ सोबत सुसंगत राहण्याकरिता, राज्यासाठी अनुज्ञेय नाही. वगळण्याची अशी एखादी अट ही जुलमी आणि अधिकारबाह्य आहे.

१५. संकुचित वर्गीकरण चाचणीचा अवलंब केला तरी, रेल्वे मंडळाचे परिपत्रक हे कायदेशीर मुलांच्या एका वर्गात दोन प्रवर्ग निर्माण करते. कायद्याने दुसऱ्या विवाहातून जन्माला आलेले मूल वैध मानले असले तरी, मयत कर्मचाऱ्याच्या पहिल्या विवाहातून जन्माला आलेल्या मुलालाच केवळ, अनुकंपा नियुक्तीच्या लाभाकरिता हक्कदार करण्यात आले आहे. अनुकंपा नियुक्ती देण्यामागचा एकमेव हेतू, जो मयत कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील संपूर्ण दारिद्र्य आणि आत्यंतिक दारिद्र्य टाळण्यासाठी आहे त्यामध्ये लादण्यात आलेली अशी कोणतीही शर्त किंवा अट जी साध्य करण्यात यावयाचे इच्छित आहे त्या उद्देशाशी, वाजवी संबंध असणे किंवा येणे आवश्यक आहे. विद्वान अतिरिक्त महान्यायअभिकर्ता यांनी असा युक्तिवाद केला की, द्विविवाह पद्धतीस निरुत्साहित करण्याच्या धोरणाचा भाग म्हणून, अनुकंपा नियुक्तीचा लाभ, केवळ पहिल्या विवाहातील पती किंवा पत्नी व मुले यांच्यापुरतेच केवळ मर्यादित ठेवणे आणि नंतरच्या विवाहातील जोडीदार व मुले यांना तो नाकारणे ही बाब राज्याकरिता अनुज्ञेय आहे. आम्हाला दुसऱ्या विवाहातून जन्माला आलेल्या मुलांना वगळण्याच्या संबंधाने विचार करावयाचा आहे. कायद्याच्या प्रवर्तनाद्वारे ज्यास वैध समजण्यात आलेले आहे असा वर्ग बहिष्कृत केल्याने, साध्य करण्यात यावयाचे इच्छित उद्दिष्टासोबत लादण्यात आलेली अट ही अवाजवी आहे. अनुकंपा नियुक्तीच्या योजनेचे प्रयोजन व उद्देश लक्षात घेता, एकदा का कायद्याने अशा मुलांना

वैध मानले तर, त्यांना अनुकंपा नियुक्तीसाठी विचारात घेण्यापासून त्यांना वगळणे, अनुज्ञेय नाही. मुले त्यांच्या आई-वडिलांची निवड करत नाहीत. निरर्थक अशा विवाहातून झालेल्या मुलाला वैध मानले तरी, त्यास अनुकंपा नियुक्ती नाकारणे ही बाब त्याच्या प्रतिष्ठेला अत्यंत आक्षेपार्ह आहे आणि भेदभावाविरोधात असलेल्या घटनात्मक हमीला आक्षेपार्ह आहे.

१६. विद्वान अतिरिक्त महान्यायअभिकर्ता यांनी यांनी असा युक्तिवाद केला की, **रामेश्वरी देवी (उपरोल्लेखित)** या प्रकरणातील या न्यायालयाचा न्यायनिर्णय हा मयत कर्मचाऱ्याच्या दुसऱ्या विवाहापासून जन्मलेल्या अल्पवयीन मुलांना कौटुंबिक निवृत्तीवेतन मंजुरीच्या संबंधाने, उद्भवला. ते बरोबर आहे. या न्यायालयाने, त्या संदर्भाने असे निरिक्षण नोंदविले की, हिंदू विवाह अधिनियम, १९५५ चे कलम १६ ने कौटुंबिक निवृत्तीवेतनाचा हक्क कायम ठेवत अवैध विवाहापांसून झालेल्या मुलांना वैध ठरवले. निवृत्तीवेतन हे कर्मचाऱ्याने दिलेल्या अनेक वर्षांच्या सेवेच्या अनुषंगाने मिळते जे कर्मचाऱ्याला आणि त्याच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबाला नियमानुसार हक्कदारीत करणारी अशी हक्काची एक बाब आहे. आम्ही जरी त्या युक्तिवादाला स्वीकारले तरी, हिंदू विवाह अधिनियम, १९५५ च्या कलम १६ च्या आधारावर या न्यायालयाद्वारे स्थापित करण्यात आलेले तत्त्व प्रस्तुतच्या प्रकरणातसुद्धा लागू असणे अपेक्षितच आहे. वैध मुलांच्या एका वर्गाला अनुकंपा नियुक्ती घेण्यापासून केवळ या

कारणास्तव वगळणे की, अर्जदाराची आई ही मयत कर्मचाऱ्याची एकापेक्षा अधिकची असलेली अशी पत्नी आहे ही बाब साध्य करावयाच्या इच्छित उद्दिष्टासोबत वाजवी संबंध असण्याची कसोटी पूर्ण करण्यात अपयशी ठरेल. कामावर असताना ज्याचे निधन झालेले होते अशा कर्मचाऱ्याच्या कुटुंबाची प्रतिष्ठा राखण्याच्या संपूर्ण उद्देशाला ते आक्रमक राहिल व त्यास ते पराजित करेल. ते, वैध लाभार्थी-वैध मुले यांच्या एका वर्गादरम्यान घटनाबाह्य भेदभाव निर्माण करते.

१७. आम्हाला या टप्प्यावर अशी नोंद घेता येईल की, कलकत्ता उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने **नमिता गोलदार (उपरोल्लेखित)** प्रकरणामध्ये रेल्वे मंडळाचे २ जानेवारी १९९२ रोजीचे परिपत्रक जे दुसऱ्या पत्नीच्या मुलांना अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीसाठी विचारात घेण्यास प्रतिबंध करते, रद्दबातल केले. त्यानंतर, उच्च न्यायालयाच्या आणखी एका खंडपीठाने, **ईस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड वि. दिलीप सिंग** [6] या प्रकरणातील आपल्या निर्णयात, आधीच्या निर्णयाला ध्यानात न घेता विपरीत दृष्टिकोन घेतला. आम्ही, **ईस्टर्न कोलफील्ड्स लिमिटेड (उपरोल्लेखित)** या प्रकरणातील नंतरच्या निर्णयाला या कारणाकरिता विचारात घेऊ शकतो की, ते कलम १६ च्या अशा अन्वयार्थावर पुढे जाते जे आमच्या दृष्टिकोनातून त्या तरतुदीच्या भाषेशी विसंगत असे आहे. खंडपीठाने खालीलप्रमाणे नमूद केले:

---

6 (२०१३) ३ कॅल एलजे ३७९

"वरील अधिनियमाचे कलम १६ (१) हे कायद्याची अशी कल्पना करते की अवैध विवाहातून जन्माला आलेल्या मुलास वैध मानण्यात येईल. सदर अधिनियमाचे कलम १६ (३) अशा मुलाचे हक्क केवळ त्याच्या आई-वडिलांच्या मालमत्तेपुरतेच आणि इतर कोणत्याही मालमत्तेबाबत नाही, मर्यादित करते.

अशाप्रकारे हे स्पष्ट आहे की, हिंदू विवाह अधिनियम, १९५५ चे कलम १६ हे केवळ अवैध विवाहातून जन्माला आलेले मुलाला त्याच्या आई-वडिलांच्या मालमत्तेमध्ये किंवा त्या संबंधाने असलेल्या किंवा नसलेल्या कोणत्याही गोष्टी संबंधात, हक्कदारीत करण्याच्या प्रयोजनार्थ आहे, असे मानते .

हा स्थापित कायदा आहे की, सार्वजनिक पद हे अनुवांशिक मालमत्ता नाही. स्टेट बँक ऑफ इंडिया विरुद्ध जसपाल कौर, (२००७) ९ एससीसी ५७१ नोंद केलेल्या या प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाने असे नमूद केले की, हे स्पष्ट आहे की, सार्वजनिक पद हे अनुवांशीक नाही म्हणून, अनुकंपा नियुक्तीकरिता असलेला हक्क हा अनुवांशिक मालमत्ता नाही.

प्रत्यक्षात, खुल्या स्पर्धेद्वारे नियमित नियुक्ती करण्याच्या नियमाला ती एक अपवाद आहे. त्यामुळे नियमित नियुक्तीच्या नियमाला अपवाद म्हणून अनुकंपा नियुक्तीच्या योजनेच्या अनुषंगाने स्वतःमध्ये नियोक्त्याद्वारे देण्यात आलेला एक

विशेषाधिकार आहे. ती मयत व्यक्तीची मालमत्ता नाही किंवा तो एक आनुवांशिक हक्कही नाही.

छत्तीसगड राज्य विरुद्ध धीरजो कुमार सेनगर (२००९) १३ एससीसी ६०० नोंद केलेल्या या प्रकरणामध्ये, सर्वोच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे नमूद केले:

"अनुकंपा तत्त्वावरील नियुक्ती ही भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १४ आणि १६ अंतर्गत सुचविण्यात आल्याप्रमाणे समानतेच्या घटनात्मक योजनेला एक अपवाद आहे."

उपरोल्लेखित कारणांमुळे, आम्ही या मताचे आहोत की, हिंदू विवाह अधिनियम, १९५५ च्या कलम १६ च्या तरतुदी याचिकाकर्त्याच्या मदतीला येणे शक्य नाही. अशा तरतुदीमधील वैधतेचे कायदेशीर गृहितक हे केवळ मयत व्यक्तीच्या मालमत्तेपुरतेच आणि इतर प्रयोजनार्थ नाही, मर्यादित आहे. त्यामुळे, कल्पनेच्या कोणत्याही कसोट्यांद्वारे अनुकंपा नियुक्ती ही मयत कर्मचाऱ्याची मालमत्ता आहे असे मानणे शक्य नाही, या कारणामुळे, योजनेअंतर्गत कर्मचाऱ्याद्वारे देण्यात आलेल्या अनुकंपा नियुक्तीच्या विशेषाधिकाराला विस्तारीत करणेकरिता कायद्याच्या अशा तरतुदीचा वापर करणे शक्य नाही."

(यावर भर देण्यात आला)

१८. उच्च न्यायालय या आधारावर पुढे नमूद केले की, कलम १६ मधील वैधता मान्य करणे ही बाब, केवळ मयत व्यक्तिच्या मालमत्तेपुरती मर्यादित आहे आणि इतर कोणत्याही प्रयोजनार्थ नाही. उच्च न्यायालयाने या तत्त्वाकडे दुर्लक्ष केलेले आहे की, कलम १६ (१), अवैध व निरर्थक आहे अशा विवाहातून जन्माला आलेल्या मुलाला वैध मानते. कलम १६ (३) मात्र, मुलाच्या मालमत्तेसंबंधातील अधिकाराला आई-वडिलांच्या मालमत्तेपुरतेच मर्यादित करते. कलम १६ (३) मात्र, कलम १६ च्या उपकलम (१) मध्ये घोषित करण्यात आलेल्या मुलाची वैधता यासंदर्भातील तत्त्वाला, कोणत्याही प्रकारे प्रभावित करीत नाही. आमचे लक्ष, **एम. मुथुराज विरुद्ध पोलिस उपमहासंचालक** [7] या प्रकरणातील, मद्रास उच्च न्यायालयाच्या एका विद्वान एकल न्यायाधीशांद्वारे हीच भूमिका स्वीकारित देण्यात आलेल्या न्यायनिर्णयाकडे वेधण्यात आलेले आहे. त्या दृष्टिकोनातून, आम्ही या निष्कर्षाप्रत पोहचलो आहोत की, रेल्वे मंडळाच्या परिपत्रकातील शर्तिंनुसार, दुसऱ्या विवाहातून जन्माला आलेल्या एखाद्या मुलाचे अनुकंपा नियुक्ती मागण्यापासून वगळणे, ही बाब अधिकारबाह्य आहे. मद्रास उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने, **भारताचे संघराज्य विरुद्ध एम. कारुंबयी**[8] या प्रकरणात **नमिता गोलदार** प्रकरणातील कलकत्ता उच्च न्यायालयाच्या दृष्टिकोनाचे अनुसरण केले. खंडपीठाच्या निर्णयाविरोधात दाखल करण्यात आलेली विशेष अनुमती याचिका या

---

7 (२०१६) ५ सीटीसी ५०

8 २०१७ लॅब. आयसी (एनओसी २३७) ६९

न्यायालयाद्वारे दि. १८ सप्टेंबर २०१७ रोजी फेटाळण्यात आली होती[9].

१९. तथापि, आम्हाला असे स्पष्ट करता येईल की, एखाद्या विशिष्ट प्रकरणात, अर्जदार हा आर्थिक गरज व इतर आवश्यकता यांचा समावेश असलेल्या योजनेच्या सर्व अटींची पूर्तता करतो की नाही, यासंबंधाने असलेला वादमुद्दा या अशा विषयवस्त आहेत ज्या प्रत्येक वैयक्तिक प्रकरणाच्या तथ्यांवर निर्णित करण्यात येतील.

२०. अंतिमतः, एकदा का दिनांक ०२.०१.१९९२ रोजीचे परिपत्रक कलकत्ता उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने **नमिता गोलदार (उपरोल्लेखित)** या प्रकरणात रद्दबातल ठरविले आणि त्यास स्वीकारण्यात आले आणि त्याची अंमलबजावणी करण्यात आली**,** त्या परिपत्रकाला संपूर्ण भारतव्यापी अमल आणि प्रभाव आहे आणि अशा परिपत्रकावर अवलंबून राहणे, हे रेल्वे अधिकाऱ्यांकरिता अनुज्ञेय नाही, या उत्तरवादीच्यावतीने केल्या गेलेल्या आग्रहाच्या युक्तिवादावर विचार करणे आवश्यक राहिल. या युक्तिवादामध्ये गुणवत्ता आहे. त्यामुळे त्यास अंतिमत्व प्राप्त झाले अशा **नमिता गोलदार (उपरोल्लेखित)** प्रकरणातील निकालानंतरही, अगोदरच्या परिपत्रकातील अटींचा पुनरुच्चार करीत ३ एप्रिल २०१३ रोजी नवीन परिपत्रक काढणे, ही बाब रेल्वे मंडळाकरिता अयोग्य अशी बाब आहे असे आम्हाला आढळते.

२१. वरील कारणांकरिता, या अपिलात आम्हाला कोणतीही गुणवत्ता आढळून

---

9 डायरी क्र.२७३५२/२०१७ मधून उद्भवलेले एसएलपी(सी)

येत नाही. संबंधित प्राधिकारी या न्यायनिर्णयाच्या शर्तिंमध्ये, संबंधित अर्जावर तीन महिन्यांच्या कालावधीत निर्णय घेतील. कोणताही खर्च नाही.

<u>दिवाणी अपील क्र. १२०१६/२०१८</u>

<u>(एसएलपी (सी) क्र. ३४८३६/२०१६ पासून उद्भवलेले)</u>

२२. अनुमती दिली.

२३. दिवाणी अपील क्र. १२०१५/२०१८ मध्ये आज देण्यात आलेला न्यायनिर्णय आणि दुसरा विवाह हा मुस्लीम वैयक्तिक कायद्याअंतर्गत कोणत्याही परिस्थितीत अनुज्ञेय आहे या दृष्टिकोनातून, या अपिलात काहीही गुणवत्ता नाही. अनुकंपा नियुक्तीचा अर्ज कायद्यानुसार इतर सर्व आवश्यक बाबींची पूर्तता करतो की नाही, यासंबंधाने प्राधिकारी छाननी करण्यास हक्कदार राहतील. अर्जावर विचार करण्याची प्रक्रिया आजपासून तीन महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करण्यात येईल.

२४. अपील, त्यानुसार निकाली काढण्यात आले आहे. कोणताही खर्च नाही.

अपीले निकाली काढली.

-: अस्वीकरण :-

या न्यायनिर्णयाचा मराठी भाषेतील ह्या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करीता वैध मानला जाईल.

****